# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 12/08/2021 (गुरूवार)
(सायंकाळ)

---

### खून

1) पो.स्टे. उमरेड :– फिर्यादी नामे– कुमार साहिल सुधाकर दमके, वय 16 वर्ष, रा. पंडीत नेहरू शाळे जवळ, उमरेड हा रेल्वे क्रासींग जवळ हितेश सारडा, रा. उमरेड यांचे नविन बांधकामावर चौकीदारी म्हणुन कामावर आहे. आरोपी नामे– आशिष सुरेश गजभिये, वय 22 वर्ष, रा. ओम पॉलटेक्नीक कॉलेज जवळ उमरेड याने साईडवर ठेकेदारा कडुन मजुरीने लोहा बांधण्याचे काम केले होते. त्या कामाचे पैसे न मिळाल्याने आरोपी हा साईडवर येवुन वारंवार फिर्यादी याला मालका कडुन पैसे मागुन दे असे म्हणत होता. दिनांक 11/08/2021 चे 17.30 वा. ते 18.00 सुमारास बायपास रोड रेल्वे क्रॉसींग जवळ बहिणाबाई नगर मार्गावर उमरेड, जि. नागपूर येथे आरोपी हा फिर्यादी कडे येवुन फिर्यादीला शिवीगाळ करून मारहाण करतांना पाहुण यातील प्रविण विनायकराव कठाणे (मृतक), वय 35 वर्ष, रा. परसोडी वाघमारे ले आउट उमरेड हा तिथे आला व मध्यस्थी करून आरोपीतास म्हटले की, 'तु ठेकेदारा कडुन पैसे घे फिर्यादीला त्रास देवु नको' असे म्हटले असता आरोपीने फिर्यादीची गच्ची पकडुन शिवीगाळ करून हातबुक्याने मारहाण केली. त्यावेळी मृतक व आरोपी मध्ये वाद झाला मृतकाने फिर्यादीचे हातातील कडे काढुन आरोपीताचे डोक्यावर मारले त्यावेळी आरोपीताने बाजुला पडलेली विट उचलुन मृतकाचे डाक्यावर जोरात मारल्याने मृतक जमिनीवर पडला. तेव्हा फिर्यादी व साक्षदार आरोपीतास अडवण्यास गेले असता आरोपीताने त्यांना सुध्दा शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. फिर्यादी व साक्षदार बाजुला होताच आरोपीने बांधकामा जवळ रचलेल्या विटां मधील विट घेवुन पुन्हा खाली पडलेल्या प्रविण कठाणे याच्या डोक्यावर मारून गंभीर जखमी करून जिवानिशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 302, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री. यशवंत सोळसे 7038046399 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील खंडाळा खुर्द येथे दिनांक 11/08/2021 चे 22.00 वा. ते 22.15 वा. दरम्यान सुकलसिंग माखनसिंग सकोम (मृतक), वय 49 वर्ष, रा. खंडाळा खुर्द, ता. काटोल व आरोपी नामे– फुलवंतीबाई सुकलसिंग सकोम, वय 44 वर्ष हे पती पत्नी असुन मृतक हा आरोपीचा चारित्र्यावर संशय घेत होता. याकारणावरून त्यांच्या झालेल्या भांडणामध्ये आरोपीने रागाचे भरात घरातील कु–हाड घेवुन मृतकाचे मानेवर व डोक्यावर मारून जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– हेमेंद्र मुरलीधर चरडे(उपसरपंच), वय 29 वर्ष, रा. खंडाळा खुर्द ता काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 302 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि आकाश शाही 9881281071 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. बोरी :– दिनांक 04/08/2021 चे 04.30 वा. ते 05.00 वा. दरम्यान फिर्यादीचे पती हे कुरीयर ट्रान्सपोर्ट चे काम करत असल्याने ते रात्री बेरात्री कामानिमीत्य बाहेर असतात. फिर्यादी वय 32 वर्ष हि तिच्या वय 5 वर्षीय मुला सोबत घरी झोपली असता फिर्यादीचे पती हे बाहेरुन दार लावून गेले होते. फिर्यादी हि झोपली असता आरोपी नामे– राजु पारधी, स्टाफ कॉलनी एमआयडीसी बोरी याने तिच्या घरी अनाधिकृत्तपणे प्रवेश करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 452, 354 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री चौधरी हे करीत आहे.

## पाण्यात बुडुन मृत्यु

पो. स्टे. कन्हान :– अंतर्गत 20 कि.मी. अंतरावरील निलज खंळाडा गावाकडे जाणऱ्या बाजुचा नदीचा पात्राचा बाजुला येथे दिनांक 09/08/2021 चे 07.00 वा. ते दिनांक 11/08/2021 चे 10.00 वा. दरम्यान कु. ईशा शंकरदास माणिकपुरी (मृतक), वय 20 वर्ष, रा. आनंदनगर झोपडपट्टी वार्ड नं. 01 हि दि 11/08/2021 चे सकाळी 10.00 वा. दरम्यान निलज खंडाळा कन्हान नदीच्या पात्रात पाण्यात बडुन मृत अवस्थेत मिळुन आली. तिचे वडिलांनी तिला नाईट डयुटी वर जाण्यास मनाई केल्याने सदर मृतक हि कोणलाही काही न सांगता स्वतःहुन कन्हान नदीच्या पात्रात जावुन पाण्यात बुडुन मरण पावली असावी व सदर मुलीच्या मरणेबाबत तिचे वडिलांना कोणावर कोणत्याही प्रकारचा संशय नसल्याने फिर्यादीच्या रिपोर्ट वरून सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– छोटेलाल शंकरदास माणिकपुरी, वय 40 वर्ष, रा. आनंदनगर झोपडपट्टी वार्ड नं 01 यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे कलम 174 जाफौ. अन्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलीस नाईक राहुल रंगारी हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर